# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों. क्र. २८८०/१९/अ.क्र. ३७३/२२/०१

**Mrs. Sarita Purshotam Khanchandani**
201, Sharda Castle B Wing, Station Road,
Near Sind National School, Opp. Old Bank of Maharashtra,
Ulhasnagar – 421004.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (नवि-२)**
नगर विकास विभाग, ४था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (नवि-२)**
नगर विकास विभाग, ४था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २८.०३.२०२२/१७.०५.२०२२</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

उक्त प्रकरणी दिनांक २८.०३.२०२२ रोजी आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:

"अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(१) अन्वये दि. १६.०९.२०१६ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. सदर अर्जान्वये त्यांनी, Compliant dated ०१.०९.२०१६ addresses to Smt. Manisha Patankar Mhaiskar, I.A.S. Principal Secretary (UD-II) Maharashtra Urban Development Department (UDD) in respect of Ulhasnagar Municipal Corporation बाबतची सविस्तर माहिती/छायांकित कागदपत्रांची मागणी केलेली होती.

अपीलकर्त्याने आयोगाकडे दि. २०.०२.२०१७ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले असून त्याद्वारे असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

AARTI

जन माहिती अधिकारी यांचे उत्तर व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश धारिकेमध्ये दिसून येत नाही.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री. अविनाश शितोळे उपस्थित असून त्यांनी असे विशद केले की, त्याच्याकडे उपलब्ध असलेल्या आवक-जावक नोंदणीनुसार अपिलकर्ता यांना दिनांक १९.०९.२०१६ रोजी उत्तर देण्यात आले होते परंतु उत्तराची प्रत व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

आज अपिलकर्ता अनुपस्थित आहेत.

तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक ०५.०५.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील."

आजच्या पुनर्सुनावणी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तरी अपिलाची सुनावणी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित राहावे. सदर **अपिलाची पुनर्सुनावणी दिनांक १६.०६.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयोगात प्रत्यक्ष आयोजित करण्यात येत आहे. तरी अपिलकर्ता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहावे. त्यानंतर या प्रकरणी अंतिम आदेश पारित करण्यात येतील.

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७.०५.२०२२**

AARTI